म. ग्रं. सं. ठाणे.
विषय कविता
सं. क्र. ९६३४

आरती प्रभु

# दि वे ला ग ण

REFBK-0012718
REFBK-0012718

मौज प्रकाशन गृह
मुंबई चार

अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि: ........

आरती प्रभु

# दिवेलागण

ग्रं. क्र. १२८९८
REFBK-0012718
REFBK-0012718

मौज प्रकाशन

मौज प्रकाशन गृह
मुंबई चार

मौज प्रकाशन : ७६

प्रथमावृत्ति : डिसेंबर १९६२

किंमत चार रुपये

© १९६२ : चिं. त्र्यं. खानोलकर

मुखपृष्ठावरील चित्र :
संभाजी कदम

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | ये रे वना | १ |
| २ | नुक्ता प्रारंभ | २ |
| ३ | व्यथा गात गात | ३ |
| ४ | दिशा...व्योम...तारे... | ४ |
| ५ | अर्थ | ५ |
| ६ | अनुप्रासलों मरणें | ६ |
| ७ | मीं श्वास पेरिले होते | ७ |
| ८ | मन | ८ |
| ९ | शिशिरामधल्या | ९ |
| १० | व्रत | १० |
| ११ | राजा | ११ |
| १२ | नादली दूरांत घंटा | १२ |
| १३ | चंद्र | १३ |
| १४ | अंगाई | १४ |
| १५ | एक इच्छा | १५ |
| १६ | अश्रु दे तूं | १६ |
| १७ | शुभ्र रुमाल इवला | १७ |
| १८ | सज्जन | १८ |
| १९ | वाट | १९ |
| २० | एक | २१ |
| २१ | एक पक्षी | २२ |
| २२ | हट्ट | २३ |
| २३ | उंट | २४ |
| २४ | पाणी | २६ |
| २५ | गाणें | २७ |
| २६ | उत्सव | २८ |
| २७ | नातें | २९ |
| २८ | छोटे | ३० |
| २९ | तूं नको | ३२ |
| ३० | आम्ही पुण्यवंत | ३३ |
| ३१ | पूजा | ३४ |
| ३२ | अहेवपण | ३५ |
| ३३ | विमानउत्तुंग | ३६ |
| ३४ | देहत्व | ३७ |
| ३५ | वेचूं ये गोवऱ्या | ३८ |
| ३६ | विजेच्या वितींनी | ३९ |
| ३७ | दुभंगतां ऊर | ४० |
| ३८ | मूळ भिंतींचें | ४१ |
| ३९ | जन्म नि मृत्यु | ४२ |
| ४० | कधी तो कधी मी | ४३ |
| ४१ | पूर | ४४ |
| ४२ | केवळ वास | ४५ |
| ४३ | नुस्ती | ४६ |
| ४४ | पाषाण | ४७ |
| ४५ | मायदूधउष्टे ओठ | ४८ |
| ४६ | पान पडतांच | ४९ |
| ४७ | ऊर भरूं येतां खोल | ५० |
| ४८ | घर | ५१ |
| ४९ | मन | ५२ |
| ५० | झरा | ५३ |
| ५१ | कडेलोट | ५४ |
| ५२ | पावरी | ५५ |
| ५३ | शांताकार | ५६ |
| ५४ | मी आणि मी | ५७ |

५५ चंद्र : सोहळा ५८
५६ चंद्र : व्यथा ५९
५७ नुस्तीं नुस्तीं रहातात ६०
५८ सूर ६१
५९ स्वगत ६२
६० जुनें गाणें ६३
६१ एकाचा मृत्यु ६४
६२ चौफेर बंद ६५
६३ दृष्टि ६६
६४ अलंकार ६८
६५ दैव ६९
६६ आशावादी ७०
६७ मरणमाडी ७२
६८ पिंजरा ७३
६९ हा हंत हंत ७५
७० अर्थ ७६
७१ शेजार ७७
७२ काळी पोर ७८
७३ पाठमोऱ्या जीवाच्या जाळीआडून ७९
७४ गुलाब ८०
७५ शाई होते शुभ्र ८१
७६ गीत ८२
७७ गजाल ८३
७८ उगाच मधलें हें ८४
७९ नको रे पंखी ८५
८० निरोप ८६
८१ कल्याण करी रामराया ८७
८२ एकजणें ८९
८३ सर्वार्थांनी ९०
८४ कनवाळू ९१
८५ पोक आलेला एक ९२
८६ टाय ९४
८७ एक फाटका ९५
८८ प्रदर्शनीय ९७
८९ माणूस म्हणजे ९८
९० कशाने कशाने ९९
९१ मरणापर्यंत १००
९२ काखेंत काळोख १०१
९३ नम्र १०२
९४ तंबूपरी बोंब १०३
९५ मुखरीत गेलों १०४
९६ आता तिकडे १०५
९७ दु:ख १०६
९८ शोध १०७
९९ डुल्की १०८
१०० एक शब्द १०९
१०१ जळत जळत जाणारा जीव ११०
१०२ जाग १११
१०३ नकार ११२
१०४ खूपच मजा आला ११३
१०५ पाडवा ११४

श्री. पु. भागवत

मंगेश पाडगांवकर

यांस

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३७३५६ वि: काव्य
क्रमांक १६३४ नों दि: ...

## ये रे घना

ये रे घना
ये रे घना
न्हावूं घाल
माझ्या मना
फुलें माझीं
अळुमाळ
वारा बघे
चुरगळूं
नको नको
म्हणतांना
गंध गेला
रानावना
ये रे घना
ये रे घना
न्हावूं घाल
माझ्या मना

१२-८-५९

# नुक्ता प्रारंभ

आता आता तुझ्या गीतां नुक्ता प्रारंभ नुक्ता
शुभ्र शेजेभोती सांज मध्ये क्षीणमंद रिक्ता
कोणी पक्षी सांजकाळीं सोबतऽ अंतराळीं
सोडी. पानजाळीमध्ये आला किर्र शीळ घाली
देठांलगतच्या पाना एकेक पाकळी लागे
ओठ विलग विलग शून्य दृष्टि तेवूं जागे
सुखदुःखांपार देश तिचा आहे तमापार
तिला नाही आता स्मृति डोळे अश्रूंहून दूर
पायांवीण प्रवासाची न्यहाळिते देवदिशा
चंद्र झुरे आता उरे कुडींतून कवडसा
आता आता तुझ्या गीतां नुक्ता प्रारंभ नुक्ता
काळरात्रींतून गात गाळ थेंब थेंब रक्ता...

२७-९-७९

## व्यथा गात गात

कशाला दिले तूं मला लक्ष डोळे
उभा तूं उभा तूं असा पाठमोरा
किती जन्म गेले त्वचेचे तमाला
तरी बाहुली रे जपे अश्रु खारा

कहाणी मनाची तुझा शब्द पाळी
मुक्याने वहातों तमीं देहमेणा
जरा बाजुला घे कुणी अश्रुबुंथी
नवा जन्म घेतो पुन्हा त्याच वेणा

कुठे दूर झाल्या तुझ्या पायवाटा
जळे उंबऱ्याशीं दिवा रात रात
धुक्याच्या दिशेला खिळे शून्य दृष्टि
किती ऊर ठेवूं व्यथा गात गात

१२६९८

# दिशा ... व्योम ... तारे ...

जहालीच आहे दिठीचीहि झोळी
नको मात्र भिक्षा तुझी सोयऱ्याची
कधी ऐकितों मी मठींतील हुंकार
मनीं मात्र इच्छा तुझ्या पायरीची

तुझ्या पायवाटा कुठे वाळवंटीं
उरे फक्त मागे तुझी सावली रे
कुणीं पाहिलेला तुला सर्वसाक्षी ?
तुवां पेरिलेले दिशा...व्योम...तारे...

११-५-५९

# अर्थ

पांघरुणाला अर्थच नव्हता कसला
झाडांना पण शिशिरहि नव्हता डसला
झडूं लागलीं पानें पिकून जेव्हा
गंध कळीला फक्त जरासा शिवला

१३-४-५९

# अनुप्रासलों मरणें

मी मातीचें ऋण फेडाया देवावरून आलों
नक्षत्रांचें क्षेत्र सोडुनी गर्भवासिं मी न्हालों
जन्मजन्मिच्या तळीं सांडलीं वेचित वेचित किरणें
यमकांमधुनी यमास जोडुन अनुप्रासलों मरणें
त्वचा सोलुनी दिधला शेला जिला एकदा तीच
तीच म्हणाली, "लाल न इतुका हवें पांघरू रक्त."
लाटांवरचा फेस गुच्छवुन घेउन आली दुसरी
अलगद पायां नव्हती छाया; देह फुलांच्या लहरी
पार जाउनी ती पापांचे खुडीत होती देठ
घोट मिठाचे घेउनि मिटले पावरिवर मीं ओठ
वक्षामधली जळती रेषा: मृगजळ झालें वाफ
ध्रुवपद शोधित पुन्हा निघालों; सोबत होते शाप

या जन्माला भेट जाहली...खराच होता सांधा
स्वप्नामधुनी नुक्तें उठलें शिल्पच असला बांधा
स्वप्नकळ्यांचें शरीर छेडित फेडित वसनें बसलों
काचोळीची गांठ कळ्यांची तमांत उसवित हसलों
"थांब कळ्यांचीं फुलें होइतों..." असें म्हणाली होती
निरभ्रतनु ती कुरकरली मीं तसल्या मलीन हातीं
भांगांमधली पिंजर कितिदा घळली मांडीवरती
आणि निखळले गालांवरती आसुच पहिल्या रातीं
न्हात गरोदर उन्हांत माती; मी व्यभिचारी फक्त
नक्षत्रांचें क्षेत्र असें मीं बाटविलें दिनरात...

# मीं श्वास पेरिले होते

तिच्या मनाच्या ऐलपैल मीं श्वास पेरिले होते
"बिजानिं उगवले दूर्वांकुर मृग हलकें निरखित होतें..."
असें म्हणाली आठवतें मज स्वप्नीं येउन राणी
मेणा उचलुन तोंच निघालें स्वप्नहि जड पायांनी
लक्ष घटांना थांग न लागे असें दिठीचें पाणी
त्या पाण्यावर उठे उन्हाचा तरंग ग्रीष्मकडांनी
सांजसकाळीं रंगांनी पण अंग खोलवर न्हावें
असेंच होतें सूर्यकमळ तें पिऊन चंद्र मिटावें
तिच्या नखांवर पतंग पेरित पंखावरले वर्ख
खळि गालांवर—नव्हे, मधाचा असाच असतो डंख
झाकत फाकत पल्लवून ती फांदी लवून हलली
पानावरच्या कवळ्या रेघा चानी हुंगुन गेली
चानीपरि ती लक्कन हलली देहपुजेच्या रात्रीं
तेव्हापासुन मूळ तमाचें रुजलें निरभ्र गात्रीं
खोल तमांतुन सांडत होत्या तिच्या सावल्या रोज
लावित होतों तरी उकळत्या रक्ताशीं मी पैज...
लयींत होतों काळिज पिंजित मीच मिठीचा स्वामी
मिनिटांवरचा झडुन मुलामा क्षितिज उडालें व्योमीं
आणिक दिसला स्वर्ग नागडा; मिटुन कवाडां बसलों
तिच्या मनाचे ऐलपैल मी मोजुंच नाही धजलों
वज्रचुड्याचे तरिही ते कर स्वस्तिक रेखित होते
तिच्या व्यथांचें मेण सारखें कुंकुम राखित होतें

## मन

एका घरांतले दिवे
एकाएकी मालवले
गच्च पंख पानांतले
पुन्हा हलून झाकले

अशा हळुवार वेळे
पुन्हा झाकलेत डोळे
कुठे हलत्या फांदीला
निश्चळच बिलगलें

मालवल्या घरालाही
असतात चारदोन
दारें, आणि माणसाला
असे तेवणारें मन

३-५-६०

# शिशिरामधल्या

शिशिरामधल्या एका विकल रातीं
तमीं दाटलीं हिवाने तृणाचीं पातीं
दाही दिशांनी ओढिला पांघरूं वारा;
दार उघडें टाकून उठून आली
अंग उघडें झाकून उगीच जरा :
जपत कापरी ज्योत कापत आली
शिशिरामधल्या एका विकल रातीं

गीत गवसण्याआधी छेडित होती
गीतासारखें हृदया...जोडित नातीं
होता देहच उत्सव वसंतनूर;
मीहि प्रणिपातापरी साष्टांग तिला
जवळ घेत भोगून लोटिली दूर :
पूर गाजत गाजत ओसरलेला;
अश्रु गिळीत एकेक निकट होती
शिशिरामधल्या एका विकट रातीं

दार तमांत लोटून निघून गेली
पानें उरलीं झाडांचीं झडून गेलीं
तार एकाकी कापत राहिली खोल
अशी पाकळी पाकळी विलग झाली
हारजीतच सारखी घडत होती
शिशिरामधल्या एका विकल रातीं

# व्रत

चार डोळे : दोन काचा दोन खाचा
यांत कोठे प्रश्न येतो आसवांचा ?
कां त्वचेच्या वल्कलांची घाण व्हावी ?
ही शिसारी पुण्यवंतांनाच यावी
आम्हि आहों गर्वगेंदाचे पुजारी
पिंक पुच्छीं टाकि नेमाने पुढारी
यांत कोठे प्रश्न येतो भुंकण्याचा ?
सर्व थोरां हक्क आहे थुंकण्याचा
कोरड्या ओठीं जिभेचें व्यंग ओलें
सर्व इच्छांचेंच आता लिंग झालें
आपुले ना आपुल्या प्रेतास खांदे
वाढुं दे ना बेंबिच्या देठांस दोंदें !
इंद्रियांचा इंद्र उद्गारे क्षतांचा :
"यांत कोठे प्रश्न आत्म्याच्या व्रताचा ?"

# व्रत

चार डोळे : दोन काचा दोन खाचा
यांत कोठे प्रश्न येतो आसवांचा ?
कां त्वचेच्या वल्कलांची घाण व्हावी ?
ही शिसारी पुण्यवंतांनाच यावी
आम्हि आहों गर्वगेंदाचे पुजारी
पिंक पुच्छीं टाकि नेमाने पुढारी
यांत कोठे प्रश्न येतो भुंकण्याचा ?
सर्व थोरां हक्क आहे थुंकण्याचा
कोरड्या ओठीं जिभेचें व्यंग ओलें
सर्व इच्छांचेंच आता लिंग झालें
आपुले ना आपुल्या प्रेतास खांदे
वाढुं दे ना बेंबिच्या देठांस दोंदें !
इंद्रियांचा इंद्र उद्गारे क्षतांचा :
" यांत कोठे प्रश्न आत्म्याच्या व्रताचा ?"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वीकृत.
अनुक्रम ...३६३५६... वि: काव्य
क्रमांक ...१६३४... नों दि ...

# राजा

फाटका संसार येथे : स्वच्छ आसूं
पक्व श्वासांची मिठाई काळजाला
स्वच्छ अश्रूंनी पुजावें येथ पुष्पां
हें खरें अन् हेंच राजे येथ मोती
देव जन्मा घालिताहे हेच राजे
त्यांतला मी गोधडी मांडून आहें

# नादली दूरांत घंटा

कोण आल्या ? "पाखरांच्या सावल्या त्या."
कोण कोठे ? "कोण कोठे ? सावल्या त्या."
सावल्या त्या हें खरें गऽ त्यांत नाही
त्यांत नाही कां जिवाला साद नाही ?
पाखरें हीं; सावल्या कोठे पळाल्या ?
सांज झालेल्या जिवाची याद नाही !
दूर कोठे कोण वल्हें मारिताहे ?
दूर होडी सावल्यांमागून वाहे !
सांज झाली देवळाच्या दीपद्वारीं
नादली दूरांत घंटा रात्र झाली
कोण आली ? "पाखरांची नीज आली."
सांडल्या बीजांत कां गे ऐकुं आली ?
ऐकुं आलें हें जिवाला काय कोठे ?
"पाघरू कोणी कुणाला पंख देतें !"

# चंद्र

दूर तेथे...दूर तेव्हा सांज झाली
दूर तेथे आपुलीही लाज गेली
एक तूं अन् एकला मी एक झालों
एक होतांना घनाच्या आड गेलों
झाकला लाजून तूं गे गाल डावा
त्या घनाच्या आड होता चंद्र तेव्हा

# अंगाई

कोण अंगाई कळ्यांची गात होती ?
नीज आल्या पक्वता अंगांत होती
त्या निजेने हो जिवाची शुभ्र जाई
पांघरूं आलें मनाला खूप कांही
नग्न झालेली पुरंध्री धूप जाळी
धूर अंगाला लपेटी धुंद वेळीं
खूप कांही पांघरूं आलेंच नाही
फक्त थोडी पक्वता अंगांत राही

# एक इच्छा

दूधभोळ्या केसरांना फक्त ठावें
कां दवाच्या बोबडया बोलां जपावें
या तनूच्या मूठमातींतून देवा
फक्त चोचींतील उष्टें बीज ठेवा

## अश्रु दे तूं

लाविशी तूं कां खुळ्याने येथ वाती ?
जा तुझीं तूं लाव दारें; कां उभी तूं ?
जागती या अजगराच्या येथ राती;
पालवाया ऊर माझा कां उभी तूं ?
तेवत्या डोळ्यांतल्या या बाहुल्यांना
एक साधा अन् खरासा अश्रु दे तूं !

# शुभ्र रुमाल इवला

शुभ्र रुमाल इवला त्याची इवलीच घडी
काळी मख्मलीची पर्स निळी फिकटशी साडी

सावळीच तनू आणि इवलासा जुस्त बांधा
प्रश्न इवलासा तिचा : "भृंग चाखितो कां मधा ?"

टंकलेखनीं नखांचीं फूलपाखरें होतात
नाडींतून सोनियाच्या तारा ऊन वाहतात

नाही स्पर्श...नाही ठसा...हर्षनिर्मळ जिवणी
तिच्या आनंदाचीं रूपें : कधी ससा...कधी चानी

इवलेंसें मन कसें : दव माळणारी दुर्वा
पोरी न्हाऊन लहान अशी गावांत बोलवा

बाहुल्यांशीं खेळतच अशी वाढली इवली
उन्हें वाढतां मोजिते खुळी आपुली सावली

उभी वक्षाशीं अजून रेघ तश्शीच अजून
नाही अश्रूंत झालेलें मीठ संपृक्त अजून

कुठल्याशा फांदीवर चिमणीने केला खोपा
हिचें घरोब्याचें स्थळ सांजसकाळच्या खेपा

# स ज्ज न

कासेची लंगोटी देणारा सज्जन
मार खात खात उंबऱ्याशीं आला
निघून गेलेलीं घरें दारांतून
पाया मात्र पंकीं भिजत राहिला

पांगणारीं उन्हें डोळ्यांशीं बांधून
पायठसे पंकीं पेरून निघाला
किटलेले वळ साक्षीस ठेवून
भरलेला ऊर जपत चालला

आपुल्या पावुलां आपणच ओढी
आपुली तिरडी आपणच जोडी
सरणाची ऊब घट्ट लपेटून
आपुलें मरण पाहात चालला

कासेची लंगोटी फेडून घेणारा
विदूषकापरी हासत राहिला...

# वाट

सेवेकरी मुद्रा असों नये बाशी
पहाटेस नेमें कातरावी मिशी

फाइलीची फीत रक्ताहून लाल
बाइलेची प्रीत सेकंदांशीं तोल

नको उमटाया स्तनावर वळ
सलामांचे हात असावे निर्मळ

कानाच्या भोकाशीं फक्त लाव फोन
इमानी ठेवावी धडावर मान

अश्रूंनाही म्हण वाळणारा घाम
घाल आंतडीचा उरास लगाम

हृदयास म्हण हालणारा पंप
लाळेच्या तारेशीं सदा असो कंप

गळ्यांतली वांती गळ्यांत ठेवून
पिंकदाणींतले शब्द घे वेचून

थोरांनी टाकिल्या श्वासां लाव नाक
कण्यासही हवें किंचितसें पोक

सहीस जातांना मालवावी छाती
भ्रांतींत ठेवाव्या डोळ्यांतल्या वाती

नको पाहूं दूर भ्रमांतला प्रांत
तुझ्या पायांसाठी कचेरीची वाट

७-६-६०

## एक

ईश्वरकृपेने आयते मिळाले
डोळ्यांतले घाव तुडुंब भरले
औषधावाचून बरें येतें रडूं
चिध्यांचें काळीज छोटें तसें कडू
शेणाच्या घरांत मेणाची बाहुली
कटीखाली तम राखून राहिली

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

## एक पक्षी

किती वेळ झाला
तूं असा त्या कंपसुक्या तारेवर
ओक्या ओक्या स्वरासारखा बसून आहेस...
पंचमाची चैत्रधून पंखांमधून
एकटा एकटा एकटक मिटून आहेस
एकेक दिवा काजळहवा लागून असा विझत आहे
तूं असा
कसाबसा लोखंडाच्या रेघेवरती बसून आहेस...

तुझीं पिसें घळतील रे अशाने !
कधी तरी भरतील का काळोखाचे पेले
तुझ्या ओंजळइवल्या देहांतील रक्ताने ?

उजाडतांच
जातील सगळे काळे बगळे
याच याच तारेखालच्या रस्त्याने !
आणि असेल ईश्वराच्या फाटक्या जिभेसारखी
लटकत तुझी इमानी कूड तारेवर !
शिटी फुंकीत जाईल धूड काळोखाच्या बोगद्यांतून...
आता वेड्या मिळतो धूरसुद्धा धुक्यांतून !

९-७-६०

...वाचा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत,
...क्रम 36354 ...... दि: ..................
...ांक .................. नों. दि. ..........

## हट्ट

तूं तरी किती हट्टी आहेस ?
खिडकीवरचा पडदा लोटून
पापण्यांची लवलव मालवून
एका थरथरत्या वातीचा हुंदका
उरांत दडपून उभी आहेस
तूं तरी किती हट्टी आहेस !

तंग झाल्या तारेवरचा कंप जरा झडूं दे
कंप सुटून कीट झडून फुलें लखलख पडूं दे...

१९-७-६०

## उंट

दिवे लागले तरी काळरात्र संपत नाही...
संपणार नाही.
प्रेतांच्या बहिऱ्या कानाशीं
बसून असतो इमानी आत्मा;
रेताच्या प्रत्येक थेंबांत
एका नव्या प्रेताचा जन्म असतो;
शोकगीतासारखी वळत असते दूरवरून
त्याच्या पावलाची वाट.

कण्याच्या प्रत्येक मणक्याचें निरांजन उजळून
चालत असतो वाळूच्या किनाऱ्याने
सावल्या लांबवीत उंट
मरणाचा मेणा सावरीत. चालतां चालतां
दिवे लागले तरी काळरात्र संपली नाही.
उत्पत्तीच्या आपत्तीची दगडी शीर
रक्तामधून कढत कढत चढली तेव्हा
या उंटाला आलें कुबड :
मानवकुळाच्या वृषणाचें काळोखांत झालें घुबड
नागडे स्तन नी वाकडें मन.
उंट तरी चालतोच आहे
ईश्वराने गिरवलेली उंच मान तशीच ठेवून
अगदी तश्शीच ठेवून...

धुक्याधुक्याच्या भिंगांतून
दिसतो आहे एकच एक डाळिंबगाल;

त्यावर थबकून आहे धारोष्ण आसू :
थांबा थांबा हात लावून नका नासूं...
त्यांतसुद्धा तेवणार आहे एक मरणदिवा.

दिवे लागतात तरी काळरात्र संपत नाही...
कधीतरी
फक्त
ऐकूं येतो
वाळवंटांतील उंटाच्या पोटांतील पाण्याचा
'डुगडुग डुगडुग' आवाज

१-८-६०

# पाणी

पाणी स्तब्ध आहे...
त्याने आपल्या रंगाचीं चिरगुटें
सांजउन्हासारखीं वाळत घातलीं आहेत
काठाकाठावरील बाळमुठींनी घडवलेल्या
वाळूच्या मनोऱ्यांवर.
पाण्याखालचा तळ तरंगापासून अंतरंगापर्यंत
त्याही पल्याड
आरसा होऊं पहात आहे;
होडीसुद्धा पायांतळीं
सांजउन्हाची साखळी सोडून उभी आहे
सनईच्या सादेसाठी.
स्तब्ध आहे...पाणी स्तब्ध आहे...

११-७-६०

## गाणें

जीभ झडली तरी जे गात असतात
शब्द शब्द शाबूत ठेवून
त्यांना मरण म्हणजे एक अफवा वाटत असते

विजनांतली पानझड
एक बाळमुठीइवला रानपक्षी
राखून खोल झाकून ठेवते
त्यांतील फडफड त्यांना ऐकूं येते;
जीभ झडली तरी जे गात असतात
शब्द शब्द काबूंत ठेवून
त्यांना मरण म्हणजे एक अफवा वाटत असते

चिमणी चिमणी उडून जाते
काडी काडी घळून पडते
पाणी पाण्यांत बुडून असतें
अशा कातरवेळीं ते ओसाडींतून चालत असतात
भेटल्या फुला चुकल्या फुला सांगत असतात :
"लौकर झाक लौकर झाक
मागूं नको आमचें नाक;
कुणी एक पोक काढून खोकत चालत आहे
म्हातारा !"
जीभ झडली तरी जे गात असतात
शब्द शब्द काबूंत ठेवून
त्यांना मरण म्हणजे एक अफवा वाटत असते

## उत्सव

रानावनांतले
कसकसले
ओलेसुके वारे
असतील आले
काळजाच्या एखाद्या स्पंदनांत;
पण कधी बापड्याच्या
दारावरील वेलीने
हलवलीं नाहीत पानें
कळ्यांच्या संभ्रमांत

कृष्णपक्षांतील
भरगच्च गर्चींतील
काळोखांत एकदाच
छकुल्याच्या पाळण्यासारखेंच
हललें मात्र त्याचें काळीज;
म्हणाला शांताकारांत
आयुष्य सोडून :
"कुणीं करावी गेल्या दिवसांची बेरीज..."

## नातें

अशा रस्त्याने जातां येतें !
गटाराच्या घाणपाण्यांत पहा तरी
पहा तरी त्यांना कसें न्हातां येतें !
इथे आमचीं पावलें बाटतात
डोळे झाकून बुबळें फाटतात
भरल्या पोटीं आतडीं तुटतात

सडून उरल्या स्तनामधून
आई मुला पान्हा पाजते...सत्यासारखा
त्यांचीं ताटें त्यांचीं असतात
उष्टीं शितें बाशीं असतात
माणसें असून भुतें दिसतात
त्यांच्या ओठीं शब्द असतात शिव्यांसारखे
(पण तो आम्हीं घातलेल्या
मूठ मूठ भिक्षेचा अर्थ असावा !)
मादी आणि माय एका कुडींत कुजत असते
अशा रस्त्याने जातां येतें !

झाडांचीं फक्त पानें झडतात
इथे यांचीं पावलें झडतात
तरीसुद्धा तान्हे डोळे हासत असतात
निळ्याभोर रानफुलांप्रमाणे.
गटाराच्या पाण्याशीं या डोळ्यांचें काय नातें ?
अशाही रस्त्याने जातां येतें !

५-९-६०

## छोटे

पल्याड कोठे
पल्याड कोठे
ढग मोठे
ढग मोठे
आकाश फाटे
आकाश फाटे  पल्याड कोठे
            पल्याड कोठे

गोठे गोठे
हादरतात
शेणस्वप्नें विरघळतात
वादळविजा कोसळतात
अल्याड कोठे कोणासाठी
गळा काढून
कोण रडतें?
पल्याड कोठे
सतारीचा सूर लावून
कुणी गाणें शोधीत बसतें

इथे इथे
फुलांचेही झाले काटे
अश्रूमधून मीठ गोठे
चिखलांतून कुरूप सावल्या
घसरतात
एका देहा

हजार मिठ्या झडपतात
पल्याड कोठे आकाश फाटे
इथे इथे त्वचा फाटे

ढग मोटे
गाणें मोटें
आकाशसुद्धा
त्याहून मोटें
आमचें मात्र लिंग छोटें
गर्भालाही रडूं येतें पल्याड कोठे
ढगांच्याहि
सगळ्या विजा मालवतात

२५-९-६०

## तूं नको

मला वाट पहायची आहे...
तुझें घर झाकूं नको—शपथ आहे
गजबजल्या तुझ्या घरादाराची
माझ्या उरावरील वाराची

अजून आहे डोळ्यांसमोर एकच ओळ
दूर वहात गेल्या तुझ्यामाझ्या दिव्यांची :
एक दिवा तुझा होता
तर एक माझा होता
दोन्ही दिवे तेववणारा हात मात्र
तुझाच होता...तुझाच होता
मला वाट पहायची आहे...

२६-१०-६०

अनुक्रम ...३६३५८... विः ...काव्य

# आम्ही पुण्यवंत

क्रमांक ...१५३५... नों दि ...

मर्मावर मार घेत आम्ही जन्मा यावें
प्राणापलीकडे येथे ढुंगण जपावें

माउलीच्या तीर्थस्तना भार नोहे पान्हा
मना दुर्जनाच्या डोळां इंद्रियांचा घाणा

व्रणा व्रणा लावी चोच एखादें पातक
कुणीं पाळावें कुणाचें रोजचें सुतक ?

स्वाती लागून नंतर उन्हें उन्हें व्हावीं
मना सज्जनाच्या गळां कोरड रहावी !

डोईवर निवे नभ झाल्या तिनी सांजा
तुमानीच्या धाग्यांतून धावे काळा मांजा

पापणी नी शाई यांत निळीकाळी लाही
लुळा पडेना का हात...शाबुत ही बाही

प्रार्थनेच्या गळ्यामध्ये बांधावया घंटा
उंटावर स्वार झालों निघें वाळवंटा

फिदा झाला नाही जरी कुडीवर प्राण
पैदा झाली धडावर परागंदा मान

पापामुखी परमेश्वर लावी चार दात
केवढी ही थोर कृपा आम्ही पुण्यवंत

६-१०-६०

# पूजा

थोडें तरी रक्त वाहो शुष्क हृदयींचें
देठ उजळण्या मंद बकुळफुलांचे

पाणियाची मुळी व्हावी निळी कमळण
तैसा शब्द व्हावा सार्थ तृषातृप्त द्रोण

दोन हातांतली पूजा येथेच राहून
दोन डोळ्यांच्या काठाने आले गेले जन्म

व्हावी हातांची परडी खुडूं यावे डोळे
अश्रुस्नात मन व्हावें मोगरीचे कळे

कांही नाही तेथोनियां गंध कळीस्तव
वाहतांना यावा जीवा पांघरूं विस्तव

२२-१०-६०

# अहेवपण

विश्रब्ध मनाच्या कातरवेळीं
एखाद्या प्राणाची दिवेलागण

सरत्या नभाची सूर्यास्तछाया
एखाद्या प्राणांत बुडून पूर्ण

एखाद्या प्राणाच्या दर्पणीं खोल
विलग पंखांचें मिटत मन

एखाद्या प्राणाचें विजनपण
एखाद्या फुलाचें फेडीत ऋण

गीतांत न्हालेल्या निर्मळ ओठां
प्राजक्तचुंबन एखादा प्राण

तुडुंब जन्मांचें सावळेपण
एखाद्या प्राणाची मल्हारधून

एखाद्या प्राणाचे सनईसूर
एखाद्या मनाचें कोवळें ऊन

निर्जन प्राणाचा व्रतस्थ दिवा
एखाद्या सरणा अहेवपण

२८-१०-६०

# विमानउत्तुंग

तुमानतंगशी फाटतां अहंता
विमानउत्तुंग चढे मलीनता

सारें कोसळतां रचावे मनोरे
चिखलओलेते मनाचे किनारे

आपुला आपण भरावा अंधार
नेमे उगाळून घामांतून ऊर

सकाळ होतांच अंधारपेरणी
चौफेर करावी मिटून पापणी

कळ्या आणि मन शब्द आणि स्मित
न्हावून कावळा यांत जावा फक्त

माय जाणे फक्त लेकराच्या बापा
आपण म्हणावें भावें देवबाप्पा

५-११-६०

# देहत्व

बुडे दीस; मागें
काळानिळा अस्त :
वैराण डोळ्यांत समंधाची गस्त

एकाच प्राणाचे
कित्येक किनारे
धुंडून पडले बर्गाड्यांत वारे

दाटोनियां येते
बारापुढे रात;
तोवरी तेवेना देहत्व प्रेतांत

६-११-६०

## वेचूं ये गोवऱ्या

माकडांच्या दैवीं । प्राप्त झालें शिश्न
वांझ कुब्जापण । फळा आलें

तुझें देवपण । आम्हां झालें घण
नभा येई घाण । जातां तडे

फुटल्या भिंगांत । काळोख ओतून
रहावें लपून । छायेऐसें

डोळाच डोळ्याला । येथे दे आसवें
तुझे तूं झाकावे । लक्ष डोळे

कुबडें कण्हतों । उतरूं पायऱ्या
वेचूं ये गोवऱ्या । आम्हांसवें

१५-११-६०

# विजेच्या वितींनी

घे गा घडवून । हवे तसे ओठ
बाळगून घट्ट । हातीं छिन्नी

प्राणापासोनिया । दिठीच्यापर्यंत
ताणावें दिगंत । पडसादीं

देहाची शिलाई । उसवून घेई
ऐकेन अंगाई । सुईसंगें

तुझ्या हातांतला । तेवणारा वर
व्हावें दिगंबर । तेव्हा मिळे

तोवरी या जन्मीं । विस्तीर्ण विराणी
विजेच्या वितींनी । मोजावी तूं

१६-११-६०

## दुभंगतां ऊर

तूंच नव्हे का रात्रीं एका अंगचोरटी
अंगणांतल्या चाफ्याखाली उभी एकटी

हलतां राघू सखि दवेळल्या सोनफुलांतुन
एका रात्रीं वळले नेत्रीं घन ओथंबुन

झोपाळ्यासह लखलखता क्षण हलुन हवेचा
तुझिया गात्रीं एका रात्रीं तडा विजेचा

एका रात्रीं हुरहुर नुसती अन् वाऱ्यावर
मन पदरासह चंद्रकळेच्या हो खालीवर

एका रात्रीं खडकाळींतुन छेडित पुरिया
दुरुन जिवावर दाटत आली पाउसछाया

एका रात्रीं दुभंगतां उर झणाणले स्वर
उभ्या घरावर सर्व रात्रभर कोसळली सर

६-१२-६०

# मूळ भिंतींचें

वाकल्या विद्रूप छाया; त्यांत झांके ऊर हें
पांगणाऱ्या सांजवेळे 'त्या' दिशेने तीर ये

खोल काळोखांत ज्योती मेण सांडी सारखी
चोच ढोलींतून सांधी कूड पंखां पारखी

मूळ भिंतींचें घराला पीळ घाली नांदत्या
बर्फ झालें आरशाचें आंतुनी मंदावत्या...

३०-१२-६०

## जन्म नि मृत्यु

सुकतात कुणाचे
        ओठ दुधाचे
दुखतात कुणाच्या
        काठ मनाचे

उरतेंहि कुणाच्या
        काजळ डोळां
मिटतात सुखाने
        फसवुन काळा

उरतात हिवाळी
        हेतु कुणाचे
सरणांत पुन्हा ये
        भूत कुणाचें

हसतात कुणीसे
        वाटेवरले
रडतात कडूसें
        खाटेवरले

फसतात कुणाचे
        जन्म नि मृत्यु
पडसादच होतें
        केवळ आयु

२-२-६१

## कधी तो कधी मी

कधी माझी कधी त्याचीही सावुली
रेंगाळे माझिया चोरट्या पावुलीं

कधी त्याच्या पायीं माझा उठे ठसा
कधी मला त्याच्या प्राणाचा आरसा

चारी डोळ्यांतून दोघेही जागतों
दारीं तोही कधी पणत लावितो

ऊन मीठपाणी काजळाच्या मागे
भिजे माझा पीळ; त्याचे धागे धागे

वाळूं घातलेलें माझें पांघरूण
कैसें ओढूं ? त्याचें मावळेल ऊन

एकाच घनाच्या दोन आम्ही सरी
प्राणावर एक, दुजी अंगावरी

गहाण शेताचे दोन आम्ही धनी
दूध दाण्यांतलें राखितों इमानी

मनाची गोफण तरी फिरताहे
कधी तो कधी मी उडूं उडूं पाहें

७-२-६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३४.३५६...... दिः ............
क्रमांक ...................... नों दि: ..........

# पूर

तुझें गात्र गात्र :
पावसाळी रात्र;
सारें क्षेत्र ऐसें
झालें पूरपात्र

माझे दोन्ही डोळे :
गाव झोंपेंतले;
मला नकळत
पुरांत बुडाले

हृदयाचें बेट :
कुठे त्याची वाट ?
हातास लागावा
एक तरी काठ!

६-२-६१

## केवळ वास

एकाच एकाच वेळे दोघांचे डोळे.
दाटून दाटून आले; वाहूं न गेले

जळत जळत दिवा विझत गेला
झाकत झाकत हवा पाऊस आला

भरले दोघांनी पेले, ओठांशीं नेले
काळोख गर्जत आले नदी नी नाले

कोणत्या दोन त्या लाटा जवळ आल्या
वाकड्या हृदयवाटा जोडीत गेल्या

बाहूंत बंदिस्त केला प्रत्येक दीस
असाच फुलांचा झाला केवळ वास

एकाच एकाच वेळे दोघांचे डोळे
दाटून दाटून आले, वाहून गेले

२-२-६१

## नुस्ती

नुस्तें नुस्तें नभ निळें सकाळ सरून
नुस्ता तरी पक्षी बसे झाडांत शिरून
नुस्ती निळी नदी मागे; पुढे गेला पूर
नुस्तें नुस्तें घर; नाही छप्पराशीं धूर
नुस्तें नुस्तें अंग तुझें : नुस्ता निळा रंग
हवे होते पदराशीं जास्वंदी पतंग
नुस्ते निळे डोळे; त्यांत काजळ भरून
नको होतें छपवाया रात्रजागरण
नुस्तीं शुभ्र फुलें आज सैल केसांवर
हवी होती वाटे त्यांत छटा लालसर
नुस्ते नुस्ते स्तन नुस्त्या चोळींत अस्मानी
नको व्हाया होती मधे लाल रेघ मोनी
नुस्तें नुस्तें निळें मन तुडुंबच नुस्तें
उन्हापावसाचें वारें त्यांत हवें होतें
नुस्ता नुस्ता घडा असा डचमळे कडे
हवे होते उराला गऽ दुखणारे तडे

१३-२-६१

## पाषाण

कडेलोटावर एक
विस्मृत पाषाण
फेसाळून भिडे वर
समुद्रउधाण

असावासा वाटे त्यांत
देऊळगाभारा
रात्रंदिन गर्जे असा
समुद्रनगारा

१३-२-६१

## मायदूधउष्टे ओठ

पुरावरील पडाव मध्येच बुडावा
तैसे आलों; ताणूं आता तंबू याही गावा

गात्या गळ्याखाली जातें ठेवी जगजेठी
फिरतें; नि मारी घण दिली होतां खुंटी

कोसळत्या किर्र वेळे ऊर 'जो जो' बोले
सुकणारें रक्त राही पान्ह्यापरी ओलें

अशा दयेलागीं होऊं आम्ही उतराई
कां हो आमुच्याच आम्हां सुतकाची घाई ?

कुणा सांगूं नये भूक, मागूं नये भिक्षा
होणारच आहे देह एक दीस रक्षा

मायदूधउष्टे ओठ नयेच बाटवूं
मृत्यु अंगाईडोळ्यांनी स्वयेंच साठवूं

१४-२-६१

# पान पडतांच

चंद्र आला डोईवर
गाव आला हाकेवर
असेल ग झोपलेला
बाळ तुझ्या मांडीवर

कशी सरळ ना वाट
पुढे नदीचें वळण
पांच वातींतील एक
तेवतसेल अजून

झाडाझाडांतील वारा
सळसळे जराजरा
लगबग येशील ग
पान पडतांच दारा

१४-२-६१

# मायदूधउष्टे ओठ

पूरावरील पडाव मध्येच बुडावा
तैसे आलों; ताणूं आता तंबू याही गावा

गात्या गळ्याखाली जातें ठेवी जगजेठी
फिरतें; नि मारी घण दिली होतां खुंटी

कोसळत्या किर्र वेळे ऊर 'जो जो' बोले
सुकणारें रक्त राही पान्ह्यापरी ओलें

अशा दयेलागीं होऊं आम्ही उतराई
कां हो आमुच्याच आम्हां सुतकाची घाई ?

कुणा सांगूं नये भूक, मागूं नये भिक्षा
होणारच आहे देह एक दीस रक्षा

मायदूधउष्टे ओठ नयेच बाटवूं
मृत्यु अंगाईडोळ्यांनी स्वयेंच साठवूं

१४-२-६१

## पान पडतांच

चंद्र आला डोईवर
गाव आला हाकेवर
असेल ग झोपलेला
बाळ तुझ्या मांडीवर

कशी सरळ ना वाट
पुढे नदीचें वळण
पांच वातींतील एक
तेवतसेल अजून

झाडाझाडांतील वारा
सळसळे जराजरा
लगबग येशील ग
पान पडतांच दारा

१४-२-६१

## ऊर भरू येतां खोल

सकाळची जाग :
जशी खोप्यांत चिमणी
सांजवेळीं अश्रू
असे डोळ्यांस इमानी

सकाळ की सांज :
कुणा म्हणायचें खोटी
दोन्हीकडे फुलें,
उन्हें माहेराला येती

कधी सकाळींही
ऊर भरू येतां खोल
दिवेलागणीला
वाटे पाऊस पडेल

१६-२-६१

## घर

वाट घेणार वळण घराचें तोंच
गातें वाहातें पाखरूं मिटतें चोच

पाय खोलांत पडून चुकतो ताल
चुकचुकते भिंतीच्या भेगेंत पाल

तिनीसांजची रानांत हंबर जशी
ऐलपैल या मनांत उदासी तशी

दारापुढील चाफ्यांत पानेंच फिकीं
घरामागील वाफ्यांत हळद पिकी

जिन्याखालील खोक्यांत मांजर मुकी
कोन्याकोन्यांत काजळी ओली नी सुकी

देवघरांत खुंटीशीं स्मरणी एक
आजी नाहीच; घरास आलेलें पोक

ओकेपणाच घराचा दाटून आहे
तोही जीवाशीं जपत जागत आहें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२८७८
शाखा (स्थळ प्रत)
१७-२-६१

# झरा

झुळझुळ झरा जसा हळहळ तसा
माझा खूळपणा वळे दूर जसजसा
तसतशी उघडी मी सर्व घरींदारीं:
रात्रींसुद्धा नको वाटे बंद बंद बारी

मंद मंद हाले जशी चंद्रापुढे फांदी
उघडमीट-दीठ तशी उरा पाहों नेदी
काकुळते श्वास जसे कळ्यांपास तसे
गंध; माझ्यापास काय माझें म्हणूं असें!

माझा खूळपणा गेला शोधूं निळेपणा
कसा कसा सोसूं देह, नेसूं रितेपणा

१४-३-६१

# कडेलोट

वेडा रानवाटांसंगें गात भटकतां
वळतां वळतां आलों असा कडेलोटा

दिवेलागणीसारखें मागे सुखदुःख
पुढे पोरकें आकाश; मधे उंच टोक

मिटूं तरी कसे...कसे खोलूं रुखे-ओले
असे दोन्ही डोळे...कुठे बोलूं मनांतलें ?

१५-३-६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... विः ..................
क्रमांक ...................... नों. दि. ..............

## पावरी

फिके फिके रंग व्हावे गर्द गर्द निळे
डोळे डोळ्यांत तसेच झाकून राहिले

तुझ्यामाझ्या अस्तित्वाची स्तब्ध रानजाळी
एकदाच उजळेल मरणाच्या वेळीं

रंग रंगांत तोंवरी गर्दसे वाहूं दे
प्राण होऊन पावरी वाजत राहूं दे

१६-३-६१

## शांताकार

ऐलथडीं आले । रंग रंग रंग
जाहले पतंग । वेडेपिसे

पैलथडीं गेले । न्हावोनियां रंग
जाहले पतंग । हळदिवे

व्यालें ऐलपैल । दिवे दिवे दिवे
पतंगाचे थवे । शांताकार

२८-३-६१

## मी आणि मी

एक मी बंदिस्त पेटें एकल्याने आंतला
बंद या दारापुढे हा मी दुजा वस्तींतला

काचसा काचेपुढे मी जीव होतों झोपतां
अन् तडे घेऊन जागें आंतल्या डोकावतां

आंतला छेडी स्वतःला प्राणपिंडीच्यापुढे
धूरजैसी चर्मदृष्टी हालते मागेपुढे

वाढतो हा पूर; मी अन् बंद या दारापुढे
पेटल्या बंदिस्त 'मी'ला देउनी हाका बुडें

शाप हे माझे मला; मीं झाकले डोळे जरी
ही पिऊं येणार नाही आंतली ज्वाळा तरी

पेटल्या या अस्थि ओल्या... मी कडें झालों मला
भोवतो माझ्यासभोती दीसरातीं एकला

२८-४-६१

## चंद्र : सोहळा

परीकथेंतल्या निद्रिस्त बेटांत
चंद्र मध्यरात्रीं पाऊस पाडीत
वाड्यावर एक, एक लिंबावरी
चंद्र बरसतो सरींवरी सरी
वाड्यापुढे झुले मोत्यांची पागोळी
मोत्यांच्या पाण्याने लिंबेंही पिवळीं
पसरे चंद्राचा पूर शिशुडोळां
आनंदाचा तेथे अंगाईसोहळा

## चंद्र : व्यथा

साचल्या अंतरीं मध्यरात्रीं असा
दर्पणामधून पडे कवडसा
पडे कवडसा हले मनमासा
मावळे दर्पणीं चंद्र फिकटसा

३०-४-६१

# नुस्तीं नुस्तीं रहातात

प्रत्येक झाडाचें
प्रत्येक पक्षी कसलें तरी
कसलें तरी गाणें गातो
प्रत्येक सूर
पानाइतकाच झाडांनाही
आपला आपला वाटतो

गाणें गातात
देणें देतात
झडून जातात
उडून जातात

झाडें नुस्तीं नुस्तीं
नुस्तीं रहातात

१-५-६१

## सूर

दूरदूरच्या व्रतस्थ घंटांचे सूर
अगदी अगदी
जवळून वहातात
हृदयाचे काठ
दुमडतात...उमलतात

वाऱ्यापाशीं
ताटातूटजशीं
फुलें ताजीं बाशीं रहातात

दूरदूरच्या
व्रतस्थ घंटांचे सूर
अगदी जवळून वहातात

१-५-६१

## स्वगत

एका रिमझिम गावीं
भरून आहे हृदयस्थ तान
पण
स्वगत विसरून तिथे
जातां आलें पाहिजे
चालून जातां येण्यासारखी
पायतळीं आहे माती
पण
जाणें न जाणें तरी कुणाच्या हातीं ?

२-५-६१

## जुनें गाणें

तें जुनें गाणें दोघांनीही म्हटलेलें
सहजपणे हृदयाने रचलेलें
एकट्यालाच आज असें आठवतें
एकटेपणा अंतर्बाह्य वाढवतें

तें जुनें गाणें : कांही शब्द प्रारंभींचे
दिवेलागण होतांनाचे गांव जसे
तें जुनें गाणें : कांही शब्द अखेरचे
तिच्या डोळ्यांत पावसाचे रंग जसे

सनईसूर तशा ओळी दूर जुन्या
हुरहुरीच्या सांजवेळा जीवघेण्या
ओली चिमणी फुगलेली पानाआड
तुंबलेपणा तसा येतो मनाआड

तें जुनें गाणें झोपाळ्याचें वारें जसें
चिकणमाती नुस्ते त्यांत पायठसे
किती खेळणीं घर त्यांचें थाटलेलें
रंगीन काचेमध्ये चित्र साठलेलें

तें जुनें चित्र : जुनें गाणेंच जसें कांही
दोन्ही मिळून झरा एक वहात राही
पुन्हा एकदा एकट्याला ऐकूं येई
अंतर्बाह्य एकटेपणा दाटूं येई

१३-५-६१

## एकाचा मृत्यु

जवळ कुणी...दूर कुणी...एकेकटा
प्रत्येक मन डोळाबंद फुगवटा
गजागजांत विरळशीं सांजउन्हें
तसेंच त्याच्या जीवाचेंही रेंगाळणें

सगेसोयरे हारजीत पहाणारे
निश्चळपणे डाव आज सोडणारे
जवळ कुणी दूर कुणी भिंतीकडे
कंदीलकाच आंत आंत काळी पडे

बारीबाहेर स्तब्धगार केळबन
घरादारांत तसेंच उभें भित्रें मन
सगळें कसें जागोजागीं जड जागें
मधला खोल मधूनच पाहूं लागे

कान लावून ऐकत आहे दुभंगून
गुप्त धून हृदयाच्या भेगेंतून
झरतो आहे घराखालील मुळांतून
प्राणासारखा एक झरा मंद ऊन

जवळ कुणी दूर कुणी एकेकटा
पांगत आहे...फुटूं गेला फुगवटा
जवळ दूर भरे धूर ओला मंद
आंतबाहेर घरदार शिळाबंद

१४-५-६१

## चौफेर बंद

आंतल्या आंतच हलती बंद श्यामल मेघ
मनाची एकेक होतसे मंद चंचल रेघ
नुकत्याच घडल्या चित्रांत रंग ओलेते जसे
दाटल्या हवेंत उजळ फिके काजवे तसे

विजनवाटेचा मध्येच पंखी लकेर घेत
जसा की पाजळी विझता दिवा उत्कट ज्योत
विस्तीर्णपणाची विश्रब्ध जिथे अखेर होत
डोंगराआडून वाकडा तिढा चीत्कार येत

अंधारवाऱ्यांत उघडे झाके डोळ्यांचें पातें
जशी की साजणी जाते नी येते, येते नी जाते
हलत्या दारांत उघडा उभा झाकून मन
अजून दाटून चौफेर बंद एकेक घन

१५-५-६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५८३५७८ वि: ..........
क्रमांक ............ नों: दि: ........

दृष्टि

मी आज इथे बारीपाशीं बसून आहें
दोन्ही डोळ्यांत दृष्टि कशी भरून आहे
तसदूर उंचसूरजसें आकाश
ऐकताहेत घरें स्तब्ध सावकाश

दिसेल जसें मन दृष्टि धुतल्यावर
तशी दुपार दारोदार छपरावर
त्यांतून कुण्या मनाचाही तळ दिसेल
पाणी धुतां येण्याइतका निर्मळ असेल

लिंबिणीचा फळभार पिवळागार
तसाच वारा शीतळ पण वजनदार
खडी फोडून वडारीण बसली आहे
पान्हा भरून तान्ह्यामुखीं झरत आहे

आज माणसें खरें खरें चालताहेत
हासूच जसें अंतरींचें बोलताहेत
शब्द येतील असेच सारें सोसल्यावर
आलेत जसे रंग पिकल्या फळांवर

कुठून तरी खार मित्री यावी दुरून
निमिषमात्र जुनें चित्र तसें हलून
शुभ्र घोळ लाल काठ सळसळून
जमीन झाली लालेलाल दणदणून

रंग रंगांत झिम्मा खेळून विरळ झाले
प्रत्येक चित्र जवळ आलें, तरळ झालें
याहून खोल अंतर्गोल पडदा दूर
फुटूं फुटूं पहात आहे दिड्दा सूर

पक्क्या घडल्या घडयाचा ये नाद जसा
नादावेलसा वाटे आंतून ऊर तसा
सूर्यकमळ मंद्रमिठींत मिटत आहे
चंद्र दूर अंतर्मूख दिसत आहे

मी आज इथे बारीपाशीं बसून आहें
दोन्ही डोळयांत दृष्टि गर्द भरून आहे

१६-५-६१

# अलंकार

हे ओलेवावजसे डोळे ऊनगार
हाच मिणमिणता माझा शिणगार

सभोवताली कोसळणारे कडे खोल
खोल तुटून...तोल सुटून कुठे तरी
कुठे तरीच कडयाखालील अस्तांतून
अस्ताव्यस्त चालत आहें कसा तरी

पाषाणावर साद घालीत मुकेपण
निर्झराचा नाद फोडूं पहात आहे
पानझडीच्या रानामधील वेळूबन
तसेंच मन चाहूल घेत उभें आहे

उभें आहे तरी शरीर त्वचेचेंच
तहानेसरशीं घेतें आहे एकेक ठेंच
पुढील गाव अंधारांत बुडत आहे
मागचा पाय पुढे तिढा पडत आहे

गालांवरून ऊनगार झरत आहे
नमकिन थेंब उरीं पुन्हा भरत आहे
एकेक मोती प्रत्येक ठेच तोडत आहे
तुटली माळ मीच पुन्हा जोडीत आहें

हे ओलेघावजसे डोळे ऊनगार
हे इतकेंच माझे असे अलंकार

१८-५-६१

## दैव

ताजी तहान ताजी भूक
सहजप्राप्त फक्त सूख
नांगरलेलें शेत तसेंच
भरून गेला ढग पुढेच

१-६-६१

# आशावादी

गढूळ प्रवाहांत वहाणाऱ्या वहाणा जशा
दिशाहीन पावलांचा अनवाणी तूंहि तसा
भरदुपारीं दुखत सुकत फुटत चाल
भुकेच्या रे सुळावर ओलें ऊर वाळत घाल

तूं एक कवी रस्त्यांतला मोन्या जिभेचा
लिलाव फुंकीत फीर तुझ्या मळक्या वहीचा
तुझा कागद नाही बाबा ईश्वराच्या सहीचा
विसर टाक...घासून नाक उचल तुकडा पावाचा !

तुझें मन, दृष्टि, चाल, बोल, सालजशी त्वचा
मिळून एक गाढव तूं. खा निमूटपणे काचा !
लाथा थोरांच्या अन् अशा ठेचा स्वतःच्या
घेतां घेतां हासत्या ठेव खाचा डोळ्यांच्या

कावळे जसे काळे, जसें कुष्ट भ्रष्ट ओंगळ
थेट तसेंच हाटांत इथे सगळें शुद्ध निर्मळ !
यांच्या थुंकीपुढे छोटी मलीन तुझी ओंजळ
यांच्या सुखापुढे दुःख तुझें किती भोंगळ !

एखाद्या लाथेसरसें कधी तरी डोकावेल
आशावादसें एक पुच्छ; हवें तसें हलेल,
श्वानपुच्छासमान तुझें स्वच्छ इमान
दिसूं दे ढुंगणावर फाटून तुमान

मरेपर्यंत मरण्याचें व्रत मात्र तुझें
माणसासारखा जगून मोडूं नकोस !
अखेर प्रवाहांतून वहाणारें प्रेत तुझें
सागरास मिळणार आहे भिऊं नकोस

२-६-६१

# मरणमाडी

चाल बाबा चाल पुढे
मोज तुझे तूंच तडे...

मन : नुस्ता एक तवंग
निष्ठुरपणे फुंकून बघ
दिसेल खरें कडू जग
रंगाविना सोलीव ढग

दिसतील झाडें लाकडाचीं
दुखतील हाडें चुन्याचीं
पावलें तुझीं कातड्याचीं
मरणमाडी चढायचीं

एकेक पायरी जिन्याची
पावलोपावलीं विरत जाय
मागे फिरूं नकोस बाबा
कुठे ठेवशिल दरींत पाय

२-६-६१

## पिंजरा

टेबलावर बंद पेन मौनासारखें
घडी घातलेला ध्यानस्थ चष्मा
भिंतीवर समाधीची तस्वीर
कोन्यांत हात जोडल्याशा वहाणा

दाराच्या फटींतून डोकावणारें
आसमंत : औषधाच्या दर्पासारखें
वस्तूवस्तूंचीं नावें वाटताहेत
झोपेंतील बरळणें अर्थहीन परकें

जांभईप्रमाणे एक रिकामी खुर्ची
वाटतो उदास निराकार त्यांत बसलेला
प्रत्येक आकारांतील बंदिस्त भार
गुहेंतील प्राचीन शिल्पसा फुटलेला

अंतराळाच्या फिकट उजेडाचा बाण
कौलारांतून थेट तिरपा घुसलेला
अष्टकोनी खोलींत वरखाली पहात
मी कुणी एक होऊन बसलेला

रंगमिश्रणापेक्षा माझी निनांवी दृष्टि
डोळ्यांतून हिवासारखी थरथरणारी
दिसूंच नये अशा एकांतांतून आरपार
गार गार थेंबांसारखी ठिबकणारी

वस्तूवस्तूवर माझा दाट स्पर्शस्तर
वस्रगाळ धुळीप्रमाणे साचलेला
दुरून कुणी एक काठी हापटीत
घड्याळाचा ताल धरून चाललेला

जवळच कुठे उंच विव्हळून
एक कुत्रा मध्येच गप्प झालेला
पडसादाच्या पल्याडचा शंखनाद
माझ्याभोवती दबा धरून गोठलेला

५-६-६१

## हा हंत हंत!

दर आठ दिवसांनी आत्महत्या करणारा माणूस
आपल्याच आंडावर लाथा झाडून झालेला षंढ
मीं पाहिला आहे; पाहतों आहें त्याची प्रेतयात्रा
त्याच्या चष्म्यांतील पारा दूरस्थ क्षितिजाहून मंद,

त्याची मुद्रा किती कठीण खडकाचीं गालफडें
भुकेइतकीच मोनी जिवणी अंतर्मुख क्षीण
रंगविहीन डोळ्यांचीं गावें : ओसाड वाळवंट
दोन काखा, दोन कुबड्या, थोडा उंट...बाकी शेण

पापाहून खोल पोट : लिलावाची मालमत्ता
आरशांतील उस्नें बिंब तसा कपडालत्ता
कातडीची खाज होते वितळणारी काच
मुलखाचा लंपट तरी संज्ञाहीन तितकाच

वहाणांसारखा ठेवून आत्मा साहेबाच्या दाराबाहेर
दर आठवडयाने कारकुनीची भीक मागे याचें मढें
हें करून तें करणाऱ्यांनी याच्यासाठी खूप केलें
डोळे तेवते ठेवून याने त्यांना फक्त काजळ दिलें

म्हणतो, "मला भोगायचें आहे माझेंच प्रेत
खांदा देऊं नका, ओलें असेल अजून रेत."
एवढें आकाश परम विशाळ; त्याखाली ओंगळ अंत?
खरें वाटलें नाही तरी निदान नका म्हणूं 'हा हंत हंत!'

२-९-६१

अर्थ

हा भार हा शिणगार
हा उत्सव ही वाटचाल
या सगळ्यावर पसरलेलें
अफवेसारखें आभाळ

याचा अर्थ सांगण्यासाठी
कुठल्या तरी झाडावर
बसलेला असेल का
एखादा पक्षी उत्सुक-पर ?

२-९-६१

अनुक्रम ...३५८०३६...... वि: ........काव्य
क्रमांक ........१८३४........ नों वि: ........

# शेजार

ईश्वराने नुक्ता घोटलेला रंग
चुकून लागला असे दोन डोळे
पारदर्शक शून्याहून मंद ओले
बाकी सगळी पोर गढूळ सवंग

निर्मळाच्या मागे जाग्या जळलयी
अश्रें किती खूप नुस्तीं आलीं भरून
तसेच उंच सूर नंतर आषाढपूर
खडकांतील चांदी स्तब्ध थरथरून

त्या डोळ्यांपाशीच फक्त कलंडावी
जन्माची कमाईशी मदिरेची सुरई !
तरी उचलं नये तिने डावी-उजवी भिवई
कमरेवरची कळशीच कां डचमळावी ?

ती हसेल हवें तेवढें...नकोच तें
कळीदार पान देईल हळुवार नखलून
जरी उष्ट्या सुपारीसह...नकोच तें
पापण्या मिटून घेते तेवढेंच नको तें...

ईश्वराने नुक्ता घोटलेला रंग
होता एका ज्योतीचा, पतंगाचा
शेजार हवा होता अथांगाचा
पण नुस्ताच जार ठरलों पलंगाचा

३-९-६१

# काळी पोर

एका फांदीच्या दोनतीन काटक्या
भटक्या अंगाच्या काळ्या पोरीने
जोडल्या नी आडमेरेने पळाली
गळदांडी उचलून पाण्याच्या मनाने

लाकडावरचा तो इमानी स्पर्श
कोंभाहून आर्जवी...तरी तो आकार :
वाटतें की त्यांतून उगवणार आहे
लाल भिंतीवर पावसाळी कौलार

कदाचित् त्या घरांत टांगीन चित्र
पण नको त्यांतील एक रेषा भगवी
कदाचित् येईल...येईलही इतक्यांत
एखादी सागरफेनावरील टिटवी

इतकी कशी ती पोर शुद्ध मानवी
सगळेंच विसरून पकडते मासा
खडकाआडील रेव्याच्या भिंतीवर
अजून ओला तिच्या हाताचा ठसा

एका फांदीच्या दोनतीन कळ्या
चोरट्या अंगाने काळ्या पोरीने
माळल्या नी आडमेरेने हळूहळू गेली
गाथन घेऊन घराच्या दिशेने

५-९-६१

# पाठमोऱ्या जीवाच्या जाळीआडून

फार फार वर्षांपूर्वी कधी आकाशाने
लकेर घेतली उंच उंच स्वतःहून
वर्षानुवर्षं आर्ष गळताहेत ढग
अरण्यगर्भांतील नदीनाल्यांतून

लटक्या देहाच्या जंजाळांत उभा
अरण्यमध्यरात्रीसारखा कणा
एकही रक्तकण उचलणें अशक्य
उभा जन्म उभारील वासुकीफणा

इथे इथे सांडलेलीं पिवळीं पानें
प्रत्येकावर शिरशिरणारें काळें हीव
काळविटांचीं स्तब्ध शिंगें तसें आसमंत
म्हाताऱ्याच्या दाढीप्रमाणे पिकलेला जीव

घाटी चढणाऱ्या बैलगाड्यांचे घुंगूर
खूपदा ऐकलेत पाठमोऱ्या जीवाच्या जाळीआडून
सनई वाजवून एक मेलेला म्हातारा
त्याचे फुगलेले गाल गेले नाहीत विझून अजून—

तसें गावें रात्रीपुरतें; पण या स्वतःलाच
आंतून रेलतां यावें इतका कणा वाकला नाही
गाणारा तरी गाईल कसा कुठे तरीच?
प्राण अंथरून बसण्यासारखें स्मशान नाही

९-९-६१

## गुलाब

गुलाबांच्या फुलांची
सांगतांना साधी गोष्ट
थबकली...विसरलीच
त्यांतल्या राजाचें नांव

मी तेव्हा मनांत म्हटलें
हिला सांगायचेंही नसेल.
पण डोळे मिटून तिने
सांगितला तो देश...तो गाव

मीही आज अनेकांतील
एक...असाच...मघलाच
तीही कुठे फोडीत असेल
कधी एखादी रंगीन काच

कुठे असेल कोण जाणे
मिटल्या डोळ्यांतील तो देश
कधी तरी पाहातां येईल
उतरतांना हा त्वचावेश

तोवर हे आमचे गुलाब
राणीच्या नांवाने फुलं देत
आणि सांजवेळीं बावून
राजाच्या नांवाने घळं देत

१०-९-६२

# शाई होते शुभ्र

तिच्या डोळ्यांतील लकाकींत उभें असतें
पावसाळी उन्हाने निथळणारें देवालय
लाल कळ्यांनीही न लासणारीं फुलझाडें
ती समजते आपल्याहून टणक, निर्भय

कैरीचा हिर्वा रंग कच्चा तरी तंग
तसाच तिच्या मनाचाहि निद्रातवंग
रक्ताच्या भिंगांतून वहाताहेत वर्षा, वसंत
तरीसुद्धा असूं नयेत त्या भिवयांना भंग ?

पाण्याहून पातळ असा एक उजेड
मद्याहून उंची असें एक दिवास्वप्न
आणि दृष्टीहून खोल असे ते डोळे
सत्य स्वयंसिद्ध तशीच ती मग्न

तिच्या डोळ्यांतील निळी ओली ही पुंजी :
कुण्या मेघावर रचलेलें असेलही गाणें
पूर्वजन्मस्मृतीसारखे ते तिचे डोळे
पापण्या उचलतात अलंकारांप्रमाणे

तांबडें फुटून कळ्या फुलतांना कधी तरी
होतात दोन्ही स्तन क्षणार्ध निरभ्र
पण त्या क्षणीं राहील का कुण्या हातीं
धीट शाबुत कुंचला ? शाईसुद्धा होते शुभ्र !

२४-९-६१

## गीत

काळ्या गऽ मातीऽ चं
कापूसबोंडाऽचंऽऽ
किती ग मोल्, कितीसं मोल?

कातरवेळेचं डोळ्यांचं डोळ्यांचं
काजळ झाडून जीवाशीं बोल्

काळ्या ग रातीचं
काळ्याच मातीचं पाणीच खोल
फुगीर पंखांची हुंगावी ओल्!

काळ्या ग रातीचा
काळीजभीतीचा
येईल पाहुणा पापण्या खोल्
काळ्या गऽ प्रीतीचं कितीसं मोल्

## ग जा ल

कोल्ह्याचें लगीन होतें उसाच्या मळ्यांत
तेव्हाच्या पावसांत हलकेंच ऊन उतरलें
एकदा उन्हाचें लगीन होतें काळ्या घनांत
तेव्हा झाडांतलें पाखरू पावसांत भिजलें

सोनचाफ्याखाली परकऱ्या पोरीनें बांधलेलें
वाहून गेलेलें उन्हापावसांत मातीचें घरकूल
नक्की आठवत नाही पाखराच्या कानांत
तेव्हा काय म्हणालें तें एक चाफ्याचें फूल

कित्येक चाफे फुलताहेत त्यानंतर आता
बसताहेत त्यांत आडोशाला पाखरें फुगून
त्यांना ती उन्हापावसाची त्या वेळची गजाल
कधी तरी सांगावीच लागेल फुलांच्या आडून

२८-९-६१

# उगाच मधलें हें

वेळींअवेळींही आपलें नव्हे
लाख रंध्रांचें हें उस्नें शरीर
नाही तर लपवतां आलें असतें
मला माझ्या काखेखाली माझें शीर

बाप मुलें लेकी सुना घरेंदारें
नसेल खोटें सारें; याहून पण खरे
पाठमोरे वारे. उगाच मधले हे
वेळूवाळूंचे किर्र कर्कश किनारे

२-१०-६१

## नको रे पंखी

अनेक जन्मांच्या वेणांनी
धपापणारें हें ऊर
उचलून ऐकूं तरी कसे
रक्ताचे थुईथुई सूर

वर्षनूवर्षं गाडा ओढून
आलेला नंगेपणा
लंगोटीने झाकूं कसा
चंढता आल्याविना

विजेच्या राज्यांत हरवले मीं
उस्ने पोशाख सारे
नको रे पंखी शीळ घालूं
जा रे जा रे...

२-१०-६१

## निरोप

अच्छा...येईन पुन्हा केव्हा तरी...केव्हा तरी
ठेवूं का या इथे कोन्यांत एकतारी
हवी तर झाक बापडी लहरी वाऱ्यावरील
ही समोरची जास्वंदी पडद्याची एकाकी बारी

पण...तुझे डोळे चुकवूनही दिसतील
डोंगरदऱ्यांपुढचे उद्यापरवाही अस्त
चुकवतां येईल का तुला त्याही वेळीं
एक चेहरा हरवलेला कहाणींतील त्रस्त

खडकाळ भिंतींचा पहारा...दरारा
तरी उगवायचा चुकेल कसा तारा ?
तो तर त्या माडाच्या झावळांतून
डोकावेल आजही...पडल्यावर वारा !

अं...उठलीस...बारीजवळच्या त्या
फांदीवरचीं पाखरें हलतां हलतां !
तुझे शब्दही गेलेले ओठापरते
डोळ्यांनी नुस्ते खरें बोलतां बोलतां

अच्छा. .येईन पुन्हा केव्हा तरी
पण...कांही नाही...नेतों ही एकतारी

३-१०-६१

# कल्याण करी रामराया

तूं कुणी
छे छे छे रे
नव्हेस कुणी
थोडें फुगीर थोडें खोलगट
एवढेंच शरीर ओलें कातडें
त्यांत एक आर्ष आतडें

गाभाऱ्यांतील दमट काळोखांत
जसे चारपांच कोनाडे
छे छे तेही नव्हेत
पण त्यांतलें
एक कोळ्याचें जाळें...तेंच रे तेंच
मन म्हणतोस तें

मोसंबी खा
खा शिरापुरी
पडूं आजारी
कढू बाजारीं घे घे लठ्ठ ग्रंथ
सोईचा पुसण्यास पुढील पंथ

तूं कुणी
शरीरसलामतवाला नुस्ता
हजामास व्यर्थ मात्र खस्ता...

अनुक्रम ....३७३५५........ दि: ..................
क्रमांक .......................... नों दि: २२-११-...

गाभाऱ्यांत मात्र
कोळ्याचें जाळें सुखवस्तू
(तेंहि नको ऐसपैस)
तिथेही फिरेल वस्तरा
तेव्हा गुंडाळूं बाडबिस्तरा

भिंती
आरसा
पाळणे
बारसा
त्यांत कुणी वस्तीला
बाहुलाबाहुली गमतीला

पैरणीला
किती हात ?
एक...दोऽन
किती बोटें ?
नाहीत !
डोकें तरी ?
नेलें कुणीं...नेलें कुणीं !
कल्याण करी रामराया !

१-१२-६१

# एकजणें

मौनाचा तो रंग । तुझें डोळेपण
काजळा त्या देण । लागे ज्योती

दिस विसावतां । मनचि पांगलें
मोगरीचे कळे । ठायीं ठायीं

साद न ये घालं । उरींच्याही लयी
नाद वाहों जाई । चहोकडे

पुष्पशेजेपरी । आगीच अंथरूं
मी-तूंपण करूं । पांघरूण

होतील गे अंगें । राख एके ठायीं
तुझीमाझी येई । वेगळूं का ?

ऐशा वसतीचीं । आम्ही एकजणें
पाठमोरें होणें । डोळांपणीं

२८-१२-६१

## सर्वार्थांनी

दर्पणींचें रूप । याच या जन्मींचें
हें त्याही आधीचें । वस्तीस ये

कळूं आलें तेव्हा । मरणाआधीन
आर्त तें पाहीन । मनीं होतें

कांहीबाहीं होतों । बोलणार थोडें
मुळाहून गोडें । त्याचें बीज

ऐशा बीजालागीं । लगबग आलों
सर्वार्थांनीं मेलों । तेव्हापून

२९-१२-६१

## कनवाळू

सुक्या मडकींत । पाणी ओलें राही
दाण्यांतली लाही । सुखरूप

घटकेचे आलों । तरी घट फोडूं
ढुंगावर ओढूं । नभ ओलें

कातड्याचे जोडे । तैसेच हे डोळे
देवें बनविले । आम्हांमापें

मनांतले दाणे । भाजाया खापर
त्याचाच वापर । सिक्षेसाठी

नाही कसा म्हणूं । ईश्वर कृपाळू
येतें मुळूमुळू । रडूं सुकें

२९-१२-६१

## पोक आलेला एक

पोक आलेला माणूस घाणा ढकलतो
अधांतरीं विमानपंखा घरघरतो
नपुंसक जातें दगडच भरडतें नुस्तें
कोकलून कुत्रा दरींत चाचपडतो

हे वळ की तापलेल्या सळ्या की
वाकवलेल्या बरगडया एकाकीपणीं
आगीच्या धुराच्या हलत्या सावल्या
यालाही मिळालेल्या जिवंतपणीं

लहानपणीं डोळे की द्रवपदार्थ सुकून
आतापर्यंत झाला संपूर्ण आभास
त्यांतून तो पाहतो...पण आमचें मात्र
झडतें प्रत्येक वेळीं कोवळें मांस

ओठ बंद: दगड सबंध: ओवीच अंध
अनुप्रासें सांधिली कण्याची कमान
नवनीतमऊ आमचे पदार्थआकार
याचें मात्र सारें प्रेतयात्रेसमान

आम्ही पाठमोरे...आमच्या पाठीच्या डोळ्यांना
तो जितका दिसतो—नववधूच्या माथ्यावर
पदर जसा—तितके आम्ही...बाकीचा तो
कार्यकारणभाव एकच खालीवर

ढुंगण आहे तेवढें तो अहंकारासारखें
दाखवतो...जगाबद्दलची निर्वैर कल्पना...
लंगोटी द्याल ? नको ! चामडी सोलून तो
पत्करील आमचा षंढ नागडेपणा

पृथ्वी वाटोळी फिरते...चंद्र मावळतो...
रानांत धुकें येतें...भरून मन येतें...
अधांतर मात्र त्याच्या हृदयाचा वास
अंधारांत पेरून पुन्हा बहिरें होतें

फेब्रुवारी १९६२

## टाय

गळ्यांत गळा घालून गळा काढून रडणारे
गळ्यांत गंडा बांधून ऐकतात जे० कृष्णमूर्ती
त्यांतलाच एक शिंप्याच्या काचकपाटांत टाय बांधून
उभा असलेला पाहिला...सुटली समस्या पुरती.

मार्च १९६२

# एक फाटका

एक फाटका कवी
त्याला व्हाव्या हवी

वाहून येतील दूरवरून
रंग आभाळ भरून
जेव्हा त्याच्या गावीं
तेव्हा त्याने कच्चीं फळें
आभाळांत डोकावून
डोळ्यांनीच रंगवावीं

फाटकीतुटकी वहाण
वाटेकडे ठेवून गहाण
त्याने धाव घ्यावी
नेसण सुटून माळावर
त्याची वाऱ्यावरील धुळीने
शाल भगवी व्हावी

सायंकालीन छायांतून
काचा फुटक्या वेचून
ओचा भरून साकी यावी
प्रत्येक तुकड्याच्या धारेवरील
वाळलेल्या मद्याची याने
चव चाखून घ्यावी

ईश्वराघरच्या न्यायाने
गाढवानेही उदात्त लाथ
प्रसंगोपात्त झाडावी
तेव्हा याने ओझें फेकून
लाथेपुढे छाती द्यावी
छाती फुटून तान यावी

मुळावरचा गाळ घेऊन
नदी वहाते डोंगरांतून
वळणें घेते उजवींडावीं
बीज पेरून खडकावर
जावें पडून सरणावर
पिकें होतील हळदिवीं

फेब्रुवारी १९६२

## प्रदर्शनीय

तूं सबंध...एकसंध...मी एकटा
बदसूर कुठे तरी वितळती कांब
थांब थांब थांब उभा कसा पहा
तो पलीकडील काळोखांत खांब

तुला नसेल गरज दिवाबत्तीची
तिथे तर अगदी अगदी भरपूर
पायांखाली वाळू नव्हे पण रस्ता
तोही कसा हुरहुर हुरहुर हुरहुर

तूं किंवा जर तर तूं ती त्या खूप
फळफळावळ पहात पहात जातां
किमान माझी तुमान फाटल्यावर
ठिगळ मारून जा सहज जातां जातां

धागेदोरे...कच्चीं फिकीं सडकीं बोरें
तंतू...जरतार...मनांतलेच किंतू
काठोकाठ...माझी विनंती तुझ्या त्या
ताज्या जिवणीइतकी लहान परंतू

चाचपडण्याचा आवाज देणारें
टिक्‌टिक् काळीज हें किती छान्
तूं सबंध एकसंध उभी बंद
प्रदर्शनीय खास ईश्वराचें इमान

फेब्रुवारी १९६२

# माणूस म्हणजे

दगड लागतां रक्त भळभळे इतुकें ठाउक
माणुस म्हणजे काय नक्कि तें नव्हतें कळलें
मोसंबीची साल रंगवी कोण कशाला
सालच कां...जर पिकून होतें पानहि पिवळें

खिडकीचे गज सातच कां अन् सकाळकिरणें
किती असावीं त्यां गुणिलेलें मीं सातांनी
देव बांधुनी जात असावा चिमणीचा अन्
खिशांत आजोबांच्या खोपा हळु हातांनी

खुंटीवरती कोट ठेवुनी आजोबा तरी
देवाघरिं कां कसे निघाले मोठें अजबच
अजब त्याहुनी दिवसाही मीं मिटतां डोळे
दिसला होता भुतासारखा मज काळोखच

आणि एकदा खडू मिळाला मला निळा अन्
पाटीवर मीं डोंगर काढुन चितारलेला
पुटें राहिलीं बोटांवर अन् कोरिच पाटी
सूर्योदयही दूर डोंगरामागे झाला

ढग एखादा मोरपिसाऱ्यापरी डवरतां
पसरायाची घरावरी माझ्याच सावली
समजत नव्हतें सनई ऐकुन दुखायचे कां
आंतुन डोळे त्या दिवशींच्या संध्याकाळीं

फेब्रुवारी १९६२

## कशाने कशाने

अनुक्रम ............ वि: ..........
क्रमांक ...... ९५... नों: दि: ..........

कशाने कशाने अशी जाग यावी
जशी वाळवंटांतुनी हाक यावी
इथे बांधलेले तबेल्यांत घोडे
कुणी उर फोडोन खिंकाळ द्यावी

इथे या कुणाच्या कुणाच्या शवाच्या
कुणी विस्तवाने विटा भाजलेल्या
इथे अंग चिंध्यांपरी अंथरोनी
अकस्मात तारा कुणीं खेचलेल्या

जसा की जसा की जसा अंतकाळीं
तसा हा तसा हा तसा सांडतो हा
असा जीव व्यर्थी तयामागुती अन्
तळां गाळ जातो कुठे स्तब्धव्हावा

फेब्रुवारी १९६२

# मरणापर्यंत

आमुच्या गोवऱ्या । आम्हींच थापाव्या
आम्हींच राखाव्या । मरणापर्यंत

पुजून पाषाण । ढुंगाखाली शेण
ठेवूं साठवून । मरणापर्यंत

आपुल्या जीवास । कान लावोनिया
जाणार न वाया । मरणापर्यंत

जन्मापरी होतो । रोज सूर्योदय
त्याचें नको भय । मरणापर्यंत

विते रोज माय । पुण्यवंतां सोय ।
भादरूं या डोय । मायमृत्यूसाठी

दोन पायांसाठी । पृथ्वी ही वाटोळी
करूं टाळाटाळी । मरणापर्यंत

एक एक वात । वेगळी पेटवूं
अग्नीही वाटवूं । मरणापर्यंत

## कावेंत काळोख

कां रे बापा पुच्छ। तोडोन घेतलें
खात न त्यामुळें। कंदमुळें

रानांतला पाला। जेव्हा लाल झाला
वाटे उमटला। लज्जाभाव

कुठें गुहेमाजी। असेलही चित्र
तिला आज वस्त्र। देतों घेतों

विजेहून लख्ख। मानवी ओळख
कावेंत काळोख। गुहेंतला

शोधा हो सज्जन। युगांच्या पूर्वींचा
माझ्याही अस्थींचा। पंजर की

92898

## नम्र

आपण उद्याचे। आज अस्तंगत
जाळतील प्रेत। उद्या पण

तोवरी तोवरी। जरा हिंडूंफिरूं
आंधळ्याने पेरूं। कांही तरी

घणावर घण। घण घण घंटा
नादा नाही तोटा। घाणा फिरे

प्रेत तरी काय। आहे फक्त सेंग
पार पाडूं सोंग। माझ्या पुता

सूर्यनारायण। रोज मावळतो
प्रेतभावें होतों। नम्र रात्रीं

## तंबूपरी बोंब

सुपांतली लाही । दळून जात्यांत
आलों मी गोत्यांत । बाबापुता

आलों गयावया । आली नाही दया
माझ्या मात्र वह्या । तारिल्यास

साऱ्याच पापांची । नोंद करोनिया
भराभर सह्या । ठोकिल्यास

तंबूपरी बोंब । ठोकून पळालों
देवालयीं आलों । जळतची

# मुखरीत गेलों

हाक ओठांतली । मुखरितां यावी
फुप्फुसें रहावीं । शुद्ध जरा

जाणिवेचा ज्वर । डोळ्यांआड धूर
पाहों नेदी घर । माझें मला

खिडकींत दाणे । ठेवितसें नेमें
पंखी म्हणे देणें । फिटलें रे

समोर पाहिलें । आंब्याकडे जेव्हा
पंखी गार हिर्वा । पक्व फळें

हाक ओठांतली । मुखरीत गेलों
शांताकार झालों । मूर्तिमंत

## आता तिकडे

आता तिकडे तिच्या कमरेइतकें
उंच हिवँगार असेल असेल
शेतांतून घराकडे पहात पहात
मधल्यामधे खळखळून हसेल

आता तिकडे तिच्या गुडघ्यांइतकें
खोल निळेंसंथ झालें असेल
कळ्याफुलांतलें अंतर मिटून
दाण्यादाण्यांत दूध आलें असेल

एका काळ्या पक्षाची तिरपी भरारी
तिच्या डोळ्यांच्या उघडमिटीसारखी
गवतावरून सरकलेली सांज
तिच्या विसरलेल्या प्रीतीसारखी

आता तिकडे तिच्या घराचें दार
बंद इतक्यांत झालेंही असेल
आणि अंगावरील वस्त्रासारखाच
शेतांत काळोख उतरला असेल

## दुःख

तळहातावरील एक फोड
गुलाब लावून थंड केला
पण आज फक्त हातांतून
फोड जाऊन गुलाब घळला

ओल्याचिंब पायांतून घराच्या
उमळून पसरलेली रात्र
पायऱ्या चुकून घसरलेल्या
जिवाचें दुखतें गात्रन्‌गात्र

चावऱ्या पापण्यांच्या केसांवरून
चेहरा पाघरूं न यावा!
हा वेश आठवणीसारखा
क्षणभरहि उतरूं न यावा!

## शोध

पृथ्वीची फिरती कडा चाटून
कवितेची एक ओल येते
आयुष्याचा एक दिवस
दानासारखा मागून नेते

स्वतःपासून दूर जातां येतें
आरशापर्यंत तेवढेंच
हें शरीर आयुष्याने बांधलेलें
त्या सूत्रालाही अदृश्य खेच

उभा जन्म पाठीमागचा उगाच
सूर्योदयाचा डोंगर वाटतो
पण संपूर्ण कवितेच्या शोधांतील
तोहि एक सूर्यास्तच असतो

## डुलकी

वेंधळें शरीर भटकूं लागतें
आग आग होणाऱ्या मनानें
अज्ञातांतील किरणांचा पुंज
त्याच्या गारव्यासह उचलणें

उचलणें अशक्य तरीसुद्धा
उघडझाप डोळ्यांची त्यांपुढची
स्वतःहून चाचपडत शोधत
चाल शाबूत काबूंत ठेवी स्वतःची

कोरड्या कोरड्या पोषाखांतून
कधी तिरपी चुकार पावसाची
सर पडते...मनालाही जरा
एक डुलकी येते मरणाची

# एक शब्द

सर्वार्थांनी प्रीती झालीस
सर्वांग प्रीती : न्यूनच नाही
प्रीतीला प्राप्त प्रीतीचा अंत
प्रीतीशिवाय तुला नांवहि नाही

अखेरपर्यंत : अस्तंगत होणाऱ्या
आजउद्याच्या कडनूकडा टिपीत
पाण्याच्या शोधांतील मुळांसारखा
राहीन माझेंच आयुष्य फोडीत

चंद्रसूर्य पहाणाऱ्या या डोळ्यांची
तशी मी शपथ घेणार नाही
सर्वार्थांचा एक शब्द मिळाला
आता कसलीच तक्रार नाही

६-८-६२

## जळत जळत जाणारा जीव

जळत जळत जाणारा जीव
नकळत नकळतच रेंगाळतो
दूरस्थ डोंगररांगांत विसावणाऱ्या
डोळ्यांतून त्यांत गारवा येतो

मागे मागे पहात परकी झालेली
माझी माझीच सहजसोबतीण
सासुरवासिणीच्या खोलींतील चुड्याची
येते येते जिवाला मंद किणकीण

शेवटाकडून एकच आलेला मेघ
भरत भरत पुन्हा दूर परततो
डोंगराआडील सखीच्या गावांत
तिच्याही छपरांत कोसळतो

नकळतच थांबलेला जीव
नकळतच पुन्हा जळूं लागतो
त्याची भगवी किनार चढूं लागते
मेघहि जिथें आकार घेत नसतो

५-८-१९६२

मराठा ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
क्रमांक

# जा ग

न्यूनगंडाशिवाय जाग येणें
हें एखाद्या दिवसाचें भाग्य
सांज होते जपतां जपतां
कायावाचामनाचें आरोग्य

बरगडयांच्या फटीफटींतून
मिणमिणणारा दूरस्थ किनारा
पाहूंच शकत नाही डोळे मिटून
होकारानकारांत अडखळणारा

भेगाभेगांतून ठिबकणारा
तहरस कसकसल्या काचांचा
कुणी घेईल का कानोसा त्यांतील
विस्मृत चित्रांच्या कुजबुजींचा

अवघ्या आयुष्याची तहान
ओठांच्या इवल्या जिवणीएवढी
पृथ्वीची सरहद्द सरणापर्यंत
तिरडीहि शवाच्या तात्पर्याएवढी

८-८-६२

## नकार

सुरवातीवर काडी लावून
पहावी वाटते अखेर
खोपा विझलेल्या काड्यांचा
होतो मनासाठी माहेर

अखेरीला नकार देत
नकार घेत वाढतें शरीर
काडीचाच आधार मागत
गाठूं पहातें पैलतीर

जीवाहूनहि जवळ आले
छातीशीं गुडघेच दोन
सारा चिखल त्यांत आला
ऐलपैल पाण्यांत बुडून

८-८-६२

# खूपच मजा आला

प्रारंभींच सूर मारून
ज्याने तळ गांठला
तोच फक्त जळत्या घरांत
डाव मांडून बसला

नाहीच मनांत असतांना
ज्याने होकार दिला
नाहीपणाच्याच प्रतिध्वनींत
त्याचा ऊर फाटला

एक तर सहज आला, गेला;
त्याचा प्राण म्हणाला,
"शवहि बेटें मस्त जळतें
खूपच मजा आला."

८-८-६२

## पाडवा

जातां जातां गेला । फाल्गुन सरून
चैत्रांतलें ऊन । उतरलें

पाण्यापास रंग । नुरले वेगळे
फक्त तें हासलें । तान्ह्यापरी

वाटे वाटे जीवा । दृष्टीचा पाडवा
आज करूं यावा । आसमंतीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३५३५८... वि: ...काव्य...
क्रमांक ...१५३४... नों: दि: ...२२...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९२७०९८

REFBK-0012718
REFBK-0012718

## पाडवा

जातां जातां गेला । फाल्गुन सरून
चैत्रांतलें ऊन । उतरलें

पाण्यापास रंग । नुरले वेगळे
फक्त तें हासलें । तान्ह्यापरी

वाटे वाटे जीवा । दृष्टीचा पाडवा
आज करूं यावा । आसमंतीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..........  विः काव्य
क्रमांक ..........  नों: दि: ..........

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 92109 C

REFBK-0012718
REFBK-0012718